ePaper

## “पाठीत सुरा खुपसला”, टीव्हीकेसोबत जाणाऱ्या काँग्रेसवर – द्रमुकचा आरोप



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | गुरुवार, दि. 07 मे 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 2 वरुन...

भीमाशंकर-आहुपे खोऱ्यात भीषण पाणीटंचाई

## अपमान केल्यास थेट तुरुंगवास; मोदी सरकारचा मोठा निर्णय!

# 'वंदे मातरम'ला राष्ट्रगीताचा दर्जा

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**पश्चिम बंगालमधील प्रचंड विजयानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय कॅबिनेटच्या पहिल्याच बैठकीत ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे. राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्'ला राष्ट्रीय गीत 'जन गण मन'च्या समान दर्जा देण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे. बैठकीला उपस्थित असलेल्या मंत्र्यांनी बंगालमधील ऐतिहासिक विजयाबद्दल पंतप्रधान मोदी यांचं अभिनंदन केलं.**





मोदी सरकारनं 'राष्ट्रीय गौरव अपमान निवारण अधिनियमा'त दुरुस्तीचा प्रस्ताव स्वीकारला आहे. ही दुरुस्ती लागू झाल्यावर बंकिमचंद्र चॅटर्जी लिखित 'वंदे मातरम्'साठी आता राष्ट्रगीतासाठी लागू असलेले नियम लागू होतील. याचं उल्लंघन गंभीर गुन्हा मानण्यात येईल.

सध्याच्या कायद्यानुसार राष्ट्रीय ध्वज, संविधान आणि राष्ट्रगीताचा अपमान केल्यास तुरुंगवास, दंड किंवा दोन्ही शिक्षांची तरतूद आहे. प्रस्तावित बदलांनंतर 'वंदे मातरम्'लादेखील हेच नियम लागू होतील. या गीताला १५० वर्ष पूर्ण होत आहेत. त्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

सध्याच्या कायद्यांनुसार, एखाद्या व्यक्तीनं राष्ट्रगीताचं गायन सुरु असताना त्यात जाणूनबुजून अडथळा आणल्यास त्या व्यक्तीला तीन वर्षांपर्यंतचा कारावास, दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. आता राष्ट्रीय गीतालादेखील याच कायद्याच्या चौकटीत आणण्यात आलं आहे. याआधी २००५ मध्ये कायद्यात दुरुस्ती करण्यात आली होती. तिरंग्याचा अपमानास्पद वापर रोखण्यासाठी ही दुरुस्ती करण्यात आली. वंदे मातरम ला राष्ट्रगीताच्या बरोबरीचा दर्जा देण्याच्या मागणीनं गेल्या वर्षी जोर धरला होता. 'वंदे मातरम'ला गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्तानं संसदेत एका विशेष चर्चेचं आयोजन करण्यात आलं होतं. त्यात सर्वपक्षीय खासदारांनी सहभाग घेतला होता. यानंतर चार महिन्यांनी मोदी सरकारनं 'वंदे मातरम'ला राष्ट्रीय गीताच्या बरोबरीचा दर्जा देण्याचा निर्णय घेतला आहे.

> “‘वंदे मातरम्’ हा आपल्या स्वातंत्र्यलढ्याचा आत्मा असून, देशभक्तीची प्रेरणा देणारा शक्तिस्रोत आहे. या गीतात भारताच्या अस्मितेचा, संस्कृतीचा आणि स्वाभिमानाचा गौरव दडलेला आहे. प्रत्येक भारतीयाने या राष्ट्रीय गीताचा सन्मान राखणे हे केवळ कर्तव्यच नाही, तर अभिमानाची बाब आहे.”
>
> - नरेंद्र मोदी, पंतप्रधान

### 1 सध्याचे नियम काय?

सध्याच्या कायद्यानुसार राष्ट्रध्वज, संविधान आणि राष्ट्रगीताचा अपमान केल्यास तुरुंगवास, दंड किंवा दोन्ही शिक्षांची तरतूद आहे. प्रस्तावित बदलांनंतर ‘वंदे मातरम्’लाही हेच नियम लागू होतील.



### 2 ३ वर्षांपर्यंत शिक्षा

राष्ट्रगीताचं गायन सुरु असताना जाणूनबुजून अडथळा आणल्यास तीन वर्षांपर्यंत कारावास, दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. आता ‘वंदे मातरम्’लाही हेच लागू.



### 3 आधीच एकदा झाला होता बदल

याआधी २००५ मध्ये कायद्यात दुरुस्ती करण्यात आली होती. तिरंग्याचा अपमानास्पद वापर रोखण्यासाठी ही सुधारणा करण्यात आली होती.



### 4 दीर्घ मागणीनंतर निर्णय

‘वंदे मातरम’ला राष्ट्रगीताच्या बरोबरीचा दर्जा देण्याची मागणी गेल्या वर्षी जोर धरली होती. १५० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने संसदेत विशेष चर्चा झाली होती.



# भीमाशंकर-आहुपे खोऱ्यात भीषण पाणीटंचाई

## जलस्रोत आटले, टँकरपुरवठा अपुरा; महिलांना २-३ किमी पायपीट

**महाईन्यूज । पुणे**

**"आख्खं आयुष्य गेलं पाणी टिपण्यात... आमच्या डोक्यावरचा हंडा कधी खाली उतरला नाही," अशा केविलवाण्या शब्दांत भीमाशंकर परिसरातील तळेघर येथील आदिवासी महिलांनी आपली व्यथा मांडली. आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम आदिवासी पट्ट्यातील भीमाशंकर पाटण व आहुपे खोऱ्यात भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून, जलस्रोत पूर्णतः आटल्याने नागरिकांना दुष्काळाच्या झळा सहन कराव्या लागत आहेत.**



या भागातील विहिरी, शिवकालीन खडकातील टाक्या, बुडीत बंधारे, तळी, डव्हरी आदी सर्व जलस्रोत कोरडे पडले आहेत. उरलेले पाणीही दूषित झाल्याने साथीच्या आजारांचा धोका वाढला आहे. परिणामी, महिलांना दररोज दोन ते तीन किलोमीटर अंतर पार करत कूपनलिका व टाक्यांमधून रात्रभर पाणी भरावे लागत आहे. अनेकदा तासनतास प्रतीक्षा करूनही फक्त एक हंडा पाणी मिळते.

पाण्याअभावी जनावरांचेही हाल सुरू असून, पिण्याच्या पाण्यासाठी ती सैरावैरा भटकताना दिसत आहेत. "डिंभे धरण जवळ असूनही आमच्या वाट्याला पाणी का येत नाही?" असा संतप्त सवाल आदिवासी बांधव उपस्थित करत आहेत. निवडणुकांच्या वेळी दिली जाणारी आश्वासने उन्हाळ्यात मात्र हवेत विरून जात असल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली.

तालुक्यातील १५ गावे व ९५ वाड्यांसाठी आठ खासगी टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. मात्र, प्रत्यक्षात पश्चिम आदिवासी भागात अपुरा व अनियमित पुरवठा होत असून, टँकर व्यवस्थेत गैरव्यवहार होत असल्याच्या तक्रारी आहेत. ग्रामपंचायतींनी टँकरची मागणी करूनही प्रशासन व ठेकेदारांच्या अनागोंदी कारभारामुळे नागरिकांची वणवण सुरूच आहे. विशेष म्हणजे, भीमाशंकर-आहुपे परिसर हा मुसळधार पावसासाठी ओळखला जातो. पावसाळ्यात चार महिने सतत पाऊस पडूनही उन्हाळ्यात तीव्र टंचाई भासणे ही गंभीर बाब ठरत आहे. पावसाळ्यात तुडुंब भरणारे जलस्रोत उन्हाळ्यात पूर्णपणे कोरडे पडत असल्याने दीर्घकालीन जलव्यवस्थापनाचा अभाव प्रकर्षाने जाणवत आहे.माळीण, पोटेवाडी, झांजरेवाडी, कोकणेवाडी, लेंभेवाडी, पसारवाडी, तळेघर, आहुपे, नांदुरकीचीवाडी, जांभळवाडी, सावरली, गोहे बुद्रुक, बोरीचीवाडी, पाचवड, कोंढरे, दिगद, राजपूर, फुलवडे आदी गावांसह अनेक वाड्या-वस्त्यांतील नागरिक दुष्काळाच्या विळख्यात सापडले आहेत.

दरम्यान, "टँकरद्वारे पाणीपुरवठा योग्य प्रकारे होत आहे का, याची सखोल चौकशी करण्यात येईल," अशी माहिती पंचायत समिती सभापती कैलास बुवा काळे यांनी दिली. दुष्काळाच्या या झळांमुळे आदिवासी भागातील जीवनमान ढासळले असून, पाण्यासाठीची ही संघर्षमय लढाई अजून किती दिवस चालणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### पाणीटंचाईचा विळखा...

भीमाशंकर-आहुपे खोऱ्यात सर्व जलस्रोत आटल्याने आदिवासी भागात भीषण पाणीटंचाई निर्माण झाली आहे. महिलांना दररोज २-३ किमी पायपीट करूनही अपुरे व दूषित पाणी मिळत असून, टँकर पुरवठा अनियमित आहे; त्यामुळे नागरिकांचे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे.

---

# पुण्यात पूरनियंत्रण प्रकल्प ठप्प; ८८ पैकी फक्त ८ ठिकाणी काम सुरू

**महाईन्यूज । पुणे**

**येत्या पावसाळ्यात शहर पूरमुक्त करण्यासाठी शासनाने शहरातील प्रमुख नाले व ओढ्यांवर सीमाभिंती बांधण्यासाठी 200 कोटी रुपयांचा भरघोस निधी मंजूर केला खरा, मात्र प्रत्यक्षात 88 पैकी अवघ्या आठ ठिकाणीच कामाला सुरुवात झाली आहे. निविदा प्रक्रिया, तांत्रिक छाननी आणि कागदपत्रे अशा कचाट्यात ही कामे अडकल्याने कामांना गती मिळताना दिसत नाही. परिणामी, यंदाही पावसाळ्यात पुणेकरांना 'जलसंकटा'चा सामना करावा लागणार, अशी स्थिती आहे.**

पावसाळा सुरू होण्यास काही महिने राहिले आहेत. त्यात गेल्या काही वर्षांत काही तासांत होणाऱ्या पावसात शहर तुंबण्याचे प्रमाण वाढले आहे. यातून पुणेकरांची सुटका करण्यासाठी आणि शहरातील पूरस्थिती नियंत्रणासाठी नाले व आंबिल ओढ्यावर सीमाभिंती उभारणे गरजेचे आहे. त्यासाठी राज्य सरकारने तीन वर्षांपूर्वी 200 कोटींचा निधी जाहीर केला.

गरजेनुसार पाच विधानसभा मतदारसंघनिहाय कामाच्या निविदा काढण्यात आल्या. मात्र, निधी न मिळाल्याने त्या रद्द कराव्या लागल्या. यानंतर 200 कोटींची एकत्रित निविदा काढण्यात आली. त्यानुसार या वर्षी जानेवारी महिन्यात कार्यादेश देण्यात आले. या अंतर्गत 88 ठिकाणी कामे होणार असली, तरी प्रत्यक्षात केवळ आठ ठिकाणीच कामे सुरू झाली आहेत.

> शहरात 88 ठिकाणी सीमाभिंतींची कामे केली जाणार आहेत. त्यापैकी 33 ठिकाणी सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले आहेत. दहा ठिकाणी तातडीने कामे पूर्ण केली जाणार आहेत. त्यापैकी 8 ठिकाणी कामे सुरू झाली आहेत.
>
> **- सदानंद लिटके, कार्यकारी अभियंता, ड्रेनेज विभाग, महापालिका**

### ...तर पहिल्याच पावसाने निर्माण होईल पूरस्थिती

बिबवेवाडी-आंबिल ओढा, भैरोबा नाला आणि नऱ्हे येथील नाल्यांलगतची परिस्थिती आजही गंभीर आहे. भीमनगर आणि शीलाविहार कॉलनीतील पाइपलाइनचे काम अजूनही 'सुरू'च आहे. जर ही कामे मे महिन्यापर्यंत पूर्ण झाली नाहीत, तर पहिल्याच मुसळधार पावसात पुण्याच्या उपनगरांत पुन्हा पाणी शिरण्याची भीती आहे.




### हप्तेवारीने निधी आणि तांत्रिक अडथळे

शासनाकडून 200 कोटींपैकी केवळ 46.10 कोटी रुपयेच महापालिकेला प्राप्त झाले आहेत. हा निधी पुरेसा नसल्याचे रडगाणे गात प्रशासन कामात टाळाटाळ करत आहे का? असा प्रश्न विचारला जात आहे. वानवडी, विठ्ठलनगर, बिबवेवाडी आणि नऱ्हे यांसारख्या भागांत जेथे काम सुरू आहे, तेथेही केवळ 'पीसीसी' आणि 'सोलिंग'च्याच स्तरावर काम आहे.

### निधी मिळूनही कामात 'ढिलाई'

महापालिका क्षेत्रातील पूरस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी 30 जुलै 2024 रोजी राज्य सरकारने 200 कोटी रुपयांचा निधी मंजूर केला. 3,729 मीटरच्या सीमाभिंती बांधण्याचे नियोजन महापालिकेने केले. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांची प्रशासकीय मान्यता मिळाली, 15 डिसेंबर 2025 ला स्थायी समितीने 'टी अँड टी इन्फ्रा' या कंपनीला 156 कोटींचे कंत्राटही दिले. 21 जानेवारी 2026 रोजी कार्यादेश (वर्क ऑर्डर) देऊन आता तीन महिने उलटले, तरीही कामाचा वेग 'नगण्य' आहे.

# स्वीकृत नगरसेवकांवरून सभागृहात गोंधळ

## निवड पुन्हा तहकूब; विरोधकांचा हौदात उतरून घोषणाबाजी, महापौरांकडून सभा स्थगित

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**स्वीकृत दहा नगरसेवक निवडीचा विषय सत्ताधारी भाजपाकडून पुन्हा तहकूब करण्यात आला. त्यावर राष्ट्रवादी कॉंग्रेसने जोरदार आक्षेप घेतला. आमच्या तीन नावांची निवड केली जावी. भाजपाने आपल्या सात नावांची घोषणा सवडीनुसार करावी, असा सल्ला देऊनही त्याला सत्ताधाऱ्यांनी प्रतिसाद न दिल्याने राष्ट्रवादीने महापौर आसनाच्या हौदात येत, दादागिरी नही चलेगी, अशी घोषणाबाजी करीत राडा घातला. विरोधकांचा आक्रमक पवित्रा पाहून महापौरांनी सभाच तहकूब केली.**



### सभागृहात तणाव

स्वीकृत नगरसेवक निवडीचा विषय पुन्हा तहकूब झाल्याने विरोधकांनी आक्रमक भूमिका घेत सभागृहात गोंधळ घातला. हौदात उतरून घोषणाबाजी करत सत्ताधाऱ्यांवर दादागिरीचा आरोप करण्यात आला, तर वाढता तणाव पाहता महापौरांनी सभा स्थगित केली.

सत्ताधाऱ्यांकडून कोश्यारी पॅटर्न ?, विरोधकांच्या कोंडीसाठी स्वीकृत नगरसेवकांची यादी अडविली; मंगळवारच्या सर्वसाधारण सभेत निवड होणार नसल्याचे संकेत, असे ठळक वृत्त दैनिक पुढारीने 1 मे रोजी प्रसिद्ध केले होते. ते वृत्त खरे ठरले आहे. महापालिकेच्या मंगळवारी (दि.5) झालेल्या सर्वधारण सभेच्या विषयपत्रिकेवर स्वीकृत नगसेवकांची निवड हा पहिलाच विषय होता. एकमत न झाल्याने अद्याप स्वीकृत नगरसेवकांची सात नावे निश्चित झालेली नाहीत.

सत्ताधाऱ्यांनी तो विषय मंगळवारी पुन्हा तहकूब करावा लागला. विनोद नढे यांनी तहकूबी मांडली.त्याला कुशाग्र कदम यांनी अनुमोदन दिले. त्यावर विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी तीव्र आक्षेप घेतला. भाजपा नगरसेवकाने विषय मांडला. त्याला अनुमोदन दिले. नंतर तो विषय तहकूब करणे, हे कामकाजाला धरून नाही. आमच्या पक्षाच्या तीन सदस्यांची निवड करा. भाजपाची नावे नंतर ठरवा. अधिकार मला दिल्यास मी सात नावे देतो. भाजपाचे इच्छुक नाराज आहेत. नाव जाहीर करण्यासाठी आमच्याकडे आग्रह धरत आहेत. राष्ट्रवादीने दिलेले नावे वैध आहेत. तो विषय प्रशासनाने सभागृहासमोर आणला आहे. ती नावे जाहीर करा. भाजपाने आपली नावे वर्ष भराने जाहीर करावीत. त्याला आमची हरकत नाही, अशी उपरोधिक टीका त्यांनी केली.

योगेश बहल यांनीही राष्ट्रवादीच्या तीन नावांची घोषणा करण्याची मागणी केली. तो विषय तहकूब करू नका. तसेच, संदीप वाघेरे यांनीही आक्षेप घेतला. तर, दुसरीकडे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे बोलू लागले. त्यांनी सभागृहाचे कामकाज सुरू ठेवण्याची महापौरांना विनंती केली. महापौरांनी विरोधकांच्या मागणीकडे दुर्लक्ष करत सभा कामकाज चालूच ठेवले. त्यानंतर सुधारित डीपीच्या हरकतीवर सुनावणीसाठी स्थायी समितीच्या तीन सदस्यांची निवड करण्याचा दुसर्या क्रमांकाचा विषयही तहकूब करण्यात आला. त्यामुळे विरोधकांचा संताप आणखी वाढला. विरोधकांनी गोंधळ घालत, महापौर आसनासमोरील हौदात गर्दी केली. दादागिरी नही चलेगी, अशा घोषणा देण्यात आल्या.

महापौर रवी लांडगे यांनी चहा पिता पिता विरोधकांना शांत राहण्याचे आवाहन केले. येत्या 15 मे रोजीच्या सभेत स्वीकृत नगरसेवकांची निवड केली जाईल. केवळ दहा दिवस थांबा, असे त्यांनी सांगितले. शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी पाणीपुरवठा या गंभीर प्रश्नावर चर्चा करावी, अशी विनंती महापौरांना केली. विरोधकांचा आक्रमक पवित्रा पाहून महापौरांनी अचानक सभा 15 मिनिटासाठी तहकूब केली. त्यामुळे आक्रमक झालेले विरोधक निमुटपणे आसनावर जाऊन बसले.

# मेट्रो रखडलीच! प्रशासनाचा ढिसाळ कारभार उघड, नागरिकांचा संताप वाढला

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**शहरातील महत्त्वाकांक्षी शिवाजीनगर-हिंजवडी मेट्रो प्रकल्पाच्या सततच्या विलंबामुळे आयटीएन्समध्ये नाराजी आहे. तसेच, पिंपरी ते निगडी मेट्रोचे कामही संथगतीने सुरू आहे. याबाबत भाजपा नगरसेविका प्रा. सोनाली गव्हाणे यांनी महापालिका सर्वसाधारण सभेत लक्ष वेधले.**

यावर, संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेवू आणि कामाला गती देवू, असे आश्वासन महापौर रवि लांडगे यांनी दिले आहे.

हिंजवडी आयटी परिसरातील हजारो नोकरदारांसाठी ही मेट्रो 'जीवनवाहिनी' ठरणार होती. मात्र, वारंवार बदलणाऱ्या तारखांमुळे हा प्रकल्प 'तारखांचा खेळ' बनल्याची भावना नागरिकांमध्ये वाढत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १ मे २०२६ पर्यंत मेट्रो सुरू करण्याचे निर्देश दिले होते. ही मुदत उलटूनही प्रकल्प पूर्ण न झाल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. यापूर्वी मार्च २०२५, सप्टेंबर, डिसेंबर आणि मे २०२६ अशा अनेक वेळा अंतिम मुदती जाहीर करण्यात आल्या; मात्र त्या प्रत्येकवेळी फोल ठरल्या आहेत.

दरमयान, या प्रकल्पात सहभागी असलेल्या TATA GROUP आणि SIEMENS सारख्या कंपन्यांवरही



कामाच्या संथ गतीबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले. विलंबाची कारणे देताना प्रशासनाकडून कामगारांच्या अनुपस्थितीपासून ते आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे साहित्य तुटवड्यापर्यंत विविध कारणे सांगितली जात आहेत. मात्र, स्थानिक पातळीवरील साधी कामेही प्रलंबित असल्याने ही कारणे अपुरी आणि असमाधानकारक असल्याची टीका सभागृहात करण्यात आली. हिंजवडी परिसरातील



खराब रस्ते आणि वाढती वाहतूक कोंडी यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचेही निदर्शनास आले. रोजच्या ट्रॅफिकमुळे तरुणांमध्ये पाठीच्या व मणक्याच्या समस्या वाढत असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली.

नगरसेविका गव्हाणे यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने या प्रकल्पासंदर्भात तातडीने विशेष बैठक बोलावून १५ जूनपर्यंत किमान १२ टप्पे सुरू करण्याचे लेखी आश्वासन द्यावे, तसेच कालबद्ध कृती आराखडा सादर करावा, अशी मागणी केली. तसेच, यापुढे एकही दिवस मुदतवाढ दिली जाऊ नये, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली. या प्रकल्पातील विलंबामुळे लोकप्रतिनिधींनाही नागरिकांच्या नाराजीला सामोरे जावे लागत असून, करदात्यांच्या पैशातून होणाऱ्या कामांमध्ये पारदर्शकता आणि वेळेचे पालन आवश्यक असल्याची भावना यावेळी व्यक्त झाली.

> "शिवाजीनगर-हिंजवडी मेट्रो, पिंपरी ते निगडी मेट्रो प्रकल्प हा पुणे आणि पिंपरी-चिंचवडकरांच्या दैनंदिन जीवनाशी थेट जोडलेला महत्त्वाचा प्रकल्प आहे. या प्रकल्पातील विलंब आता असह्य होत असून, तो ठरलेल्या वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने तातडीने ठोस कृती आराखडा सादर करावा आणि कामाला गती द्यावी, हीच आमची स्पष्ट मागणी आहे,"
>
> **- प्रा. सोनाली गव्हाणे, नगरसेविका, भाजपा, पिंपरी-चिंचवड महापालिका.**



## भूमिका

**भारतीय लोकशाहीची ओळख तिच्या विविधतेत आहे. भाषा, संस्कृती, प्रादेशिक अस्मिता आणि वेगवेगळ्या विचारसरणींवर उभे राहिलेले प्रादेशिक पक्ष हे या व्यवस्थेचे महत्त्वाचे स्तंभ मानले गेले. मात्र गेल्या काही वर्षांत या पक्षांची झालेली घसरण लक्षात घेतली, तर ही विविधता केवळ सैद्धांतिक राहण्याची भीती निर्माण झाली आहे.**

# काँग्रेसच्या कलमांचे 'कलम'




विशेषतः भाजपविरोधी सरकारे असलेल्या राज्यांमध्ये प्रादेशिक पक्षांवर आलेले संकट हा चिंतेचा विषय ठरत आहे. पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेस, ओडिशातील बिजू जनता दल, तेलंगणातील भारत राष्ट्र समिती किंवा आंध्र प्रदेशातील वायएसआर काँग्रेस—या पक्षांनी आपल्या राज्यात दीर्घकाळ मजबूत सत्ता राखली होती. मात्र केंद्रातील सत्ताधारी पक्ष म्हणून भाजपने विविध राजकीय डावपेच राबवत या पक्षांना आव्हान दिले. काही ठिकाणी थेट निवडणूक लढतीत पराभव, तर काही ठिकाणी फूट, नेतृत्वावर दबाव किंवा बदलती आघाडी—या मार्गांनी प्रादेशिक पक्षांची ताकद कमी होत गेली.

या पार्श्वभूमीवर तृणमूल काँग्रेसच्या भवितव्याबाबतही प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. ममता बॅनर्जी या राष्ट्रीय पातळीवरील प्रभावी विरोधी नेत्या म्हणून ओळखल्या जातात. त्यांच्या नेतृत्वाखालील पक्षाने भाजपला थेट आव्हान दिले आहे. मात्र इतर प्रादेशिक पक्षांच्या अनुभवावरून पाहता, सत्तेतील बदलानंतर संघटनात्मक ताकद टिकवणे आणि कार्यकर्त्यांमध्ये आत्मविश्वास राखणे हे मोठे आव्हान ठरते.

इतिहास सांगतो की प्रादेशिक पक्षांचा उदय हा स्थानिक प्रश्न, अस्मिता आणि केंद्राच्या धोरणांविरोधातील असंतोषातून झाला. १९६०-७० च्या दशकात अनेक राज्यांमध्ये अशा पक्षांनी काँग्रेसच्या वर्चस्वाला पर्याय दिला. त्यांनी स्थानिक विकास, भाषा आणि संस्कृतीचे प्रश्न पुढे आणले. त्यामुळे भारतीय संघराज्य व्यवस्थेला संतुलन मिळाले. मात्र आज राष्ट्रीय पातळीवर एकाच पक्षाचे वर्चस्व वाढल्याने या संतुलनावर परिणाम होत आहे. लोकशाहीत सत्तांतर आणि स्पर्धा आवश्यक असते, पण विरोधी आवाज मजबूत असणे तितकेच गरजेचे आहे. प्रादेशिक पक्ष कमकुवत झाल्यास स्थानिक प्रश्नांना हवा तसा न्याय मिळेलच असे नाही. यामुळे राजकारण अधिक केंद्रीकृत होण्याचा धोका निर्माण होतो. त्यामुळे प्रादेशिक पक्षांचे अस्तित्व केवळ राजकीय समीकरणापुरते मर्यादित नसून, ते लोकशाहीच्या आरोग्याशी निगडित आहे.

आजची परिस्थिती पाहता विरोधी पक्षांनी एकत्र येण्याची गरज अधिक प्रकर्षाने जाणवते. अलीकडील निवडणुकांमध्ये विरोधकांनी आघाडी करून लढल्यास सत्ताधाऱ्यांना प्रभावी आव्हान देता येते, हे दिसून आले आहे. त्यामुळे पुढील काळात प्रादेशिक पक्षांनी व्यापक सहकार्याचा मार्ग स्वीकारणे आवश्यक ठरू शकते. एकूणच, प्रादेशिक पक्षांची घटती ताकद ही केवळ राजकीय घटना नाही, तर लोकशाहीतील विविधतेसाठी इशारा आहे. सत्ताधारी आणि विरोधक या दोघांनीही या वास्तवाचा गांभीर्याने विचार करून लोकशाहीतील संतुलन राखण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.

## प्रासंगिक »

### संत आणि राजा

**एक दानशूर राजा होता. त्याच्या उदार स्वभावाची कीर्ती दूरवर पसरली होती. एकदा एक संत त्याला भेटण्यासाठी दरबारात आले आणि याचकांच्या रांगेत बसले. जेव्हा त्यांची पाळी आली.**

तेव्हा संत म्हणाले, "मी दान सेवकाच्या हातून नाही, राजाच्या हातूनच घेईन." राजाने त्यांना भेट दिली आणि विचारले, "महाराज, काय हवे आहे?" संत म्हणाले, "मला इतके धन द्या की मी त्यातून स्वर्ग मिळवू शकेन." राजा चकित झाला. त्याने विचारले, "धनाने स्वर्ग कसा मिळेल?" संत हसून म्हणाले, "राजन, तुम्ही सतत दान देता, पण यामुळे लोक आळशी होत आहेत. फक्त दान देत राहिलात तर तिजोरी रिकामी होईल आणि लोकांमध्ये काम करण्याची इच्छा उरणार नाही." राजाने उपाय विचारला. संत म्हणाले, "दानाऐवजी लोकांना काम द्या. त्यांना स्वावलंबी बनवा. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढेल आणि राज्यही समृद्ध होईल." राजाला सत्य उमगले आणि त्याने दानधर्माची पद्धत बदलली.

- तात्पर्य : **स्वावलंबन हेच खरे सामर्थ्य; तेच व्यक्ती आणि राष्ट्राच्या प्रगतीचा पाया आहे.**

राज्यात खळबळ उडवून देणाऱ्या भोंदू अशोक खरात प्रकरणानंतर अवघ्या एका महिन्यात पोलिसांनी राज्यभरातील १६ भोंदू बाबांवर कारवाई केल्याची बाब अत्यंत गंभीर आहे.

# हे भोंदू बुवा आणि बाबा इतके का आणि कसे बोकाळले?



पुरोगामी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्रात अंधश्रद्धा आणि बुवाबाजीचे इतके मोठे जाळे पसरले आहे, हे या घटनांमधून स्पष्ट होते. विशेष म्हणजे या प्रकरणांत महिलांचे लैंगिक शोषण आणि आर्थिक फसवणूक मोठ्या प्रमाणात झाल्याचे उघड झाले आहे. अंधश्रद्धेविरोधातील लढा हा नवीन नाही. डॉ. नरेंद्र दाभोलकर आणि त्यांच्या महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने अनेक वर्षे सातत्याने जनजागृती केली. त्यांच्या प्रयत्नांतून २०१३ मध्ये जादूटोणा विरोधी कायदा अस्तित्वात आला. मात्र कायदा असूनही त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याने अशा घटना पुन्हा पुन्हा घडताना दिसतात. कायद्याची अंमलबजावणी ही केवळ कागदोपत्री न राहता प्रत्यक्षात झाली पाहिजे, हीच या घटनांची शिकवण आहे.

या भोंदूंच्या जाळ्यात फक्त अशिक्षित किंवा ग्रामीण लोकच अडकतात, असा समज चुकीचा ठरतो आहे. सुशिक्षित, शहरी आणि सधन कुटुंबातील लोकही या फसवणुकीचे बळी ठरत आहेत. अडचणी, आजारपण, वैयक्तिक समस्या यांचा गैरफायदा घेत भोंदू बाबा लोकांची मानसिकता डळमळीत करतात आणि त्यातून शोषणाचा मार्ग मोकळा करतात. त्यामुळे ही केवळ कायद्याची समस्या नसून सामाजिक जागृतीचीही मोठी गरज आहे.खरात प्रकरणानंतर पीडित महिलांनी पुढे येत तक्रारी दाखल करण्यास सुरुवात केली, ही सकारात्मक बाब आहे. समाजात हळूहळू का होईना, पण या विषयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत असल्याचे संकेत मिळत आहेत. भीती, लाज आणि सामाजिक प्रतिष्ठेच्या अडथळ्यांवर मात करून पीडितांनी आवाज उठवणे, हेच अशा प्रवृत्तींना रोखण्याचे प्रभावी साधन ठरू शकते. तथापि, केवळ जनजागृती पुरेशी नाही. पोलिस यंत्रणेचे प्रशिक्षण, प्रत्येक ठाण्यात दक्षता अधिकारी आणि अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष स्थापन करणे अत्यावश्यक आहे. तसेच या कायद्याचे नियम तातडीने तयार करून त्याची काटेकोर अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

एकूणच, अंधश्रद्धेविरोधातील लढा हा सरकार, सामाजिक संस्था आणि नागरिक यांच्या संयुक्त प्रयत्नांतूनच यशस्वी होऊ शकतो. अन्यथा, अशा भोंदू प्रवृत्ती समाजाच्या कमकुवत बाजूंचा फायदा घेत राहतील आणि 'पुरोगामी' महाराष्ट्राची ओळख धोक्यात येईल.

## ।। अभंगवाणी ।।



नये जरी तुज मधुर उत्तर ।
दिधला सुस्वर नाहीं देवें ॥१॥

नाहीं तयाविण भुकेला विठ्ठल ।
येईल तैसा बोल रामकृष्ण ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे.
एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ७ मे रोजी मुंबई विमानतळ सहा तास बंद

## मान्सूनपूर्व देखभालीसाठी निर्णय; उड्डाणांवर परिणाम, प्रवाशांना सतर्कतेचा इशारा

**महाईन्यूज । मुंबई**

**मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे गुरुवार (७ मे) रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ या कालावधीत सर्व विमानसेवा पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे. मान्सूनपूर्व देखभाल (PRE-MONSOON MAINTENANCE) कामांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. या सहा तासांच्या काळात कोणतेही विमान उड्डाण किंवा लँडिंग होणार नाही.**



विमानतळ प्रशासनाच्या माहितीनुसार, प्रवाशांना कमीत कमी त्रास होईल यासाठी हे नियोजन सुमारे सहा महिन्यांपूर्वीच करण्यात आले होते. एअरलाइन्स आणि विमानचालन प्राधिकरणांच्या समन्वयाने अनेक उड्डाणांचे वेळापत्रक आधीच बदलण्यात आले आहे.

देखभालीदरम्यान धावपट्ट्या, पृष्ठभागाची झीज, तसेच हवाई बाजूच्या पायाभूत सुविधांची सखोल तपासणी केली जाणार आहे. मुंबईत पावसाळ्यात होणाऱ्या मुसळधार पावसामुळे पाणी साचण्याचा धोका लक्षात घेऊन ही कामे अत्यावश्यक मानली जातात.

दरम्यान, या कालावधीत काही उड्डाणे रद्द होणे, उशीर होणे किंवा मार्ग बदलणे शक्य आहे. काही विमानांचे वळवून पुणे, अहमदाबाद, गोवा, तसेच दिल्ली, बंगळूर किंवा चेन्नई येथे वळवले जाण्याची शक्यता आहे. प्रवाशांनी विमानतळावर जाण्यापूर्वी आपल्या फ्लाइटची स्थिती संबंधित एअरलाइनकडून किंवा अधिकृत संकेतस्थळावर तपासावी, तसेच अतिरिक्त वेळ राखून ठेवावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. तसेच, फ्लाइट रद्द किंवा वेळापत्रक बदल झाल्यास पुनर्बुकिंग किंवा परताव्यासाठी संबंधित एअरलाइनशी संपर्क साधण्याचेही सांगण्यात आले आहे.


### महत्त्वाची सूचना...

७ मे रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील सर्व उड्डाणे बंद राहणार आहेत. या काळात फ्लाइट रद्द, विलंब किंवा वळवले जाण्याची शक्यता असल्याने प्रवाशांनी वेळापत्रक आधी तपासूनच प्रवासाचे नियोजन करावे.

# एल निनोचा मोठा धोका; यंदा मॉन्सून कोरडा, खरीप हंगाम संकटात...

**महाईन्यूज । मुंबई**

**जून-जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर या कालावधीसाठी पावसाच्या सरासरीतील तफावत (MEAN PRECIPITATION ANOMALY) दर्शवणारा हंगामी अंदाज समोर आला आहे. या अंदाजानुसार पॅसिफिक महासागरात विकसित होत असलेल्या एल निनोच्या प्रभावामुळे पावसाच्या पॅटर्नमध्ये बदल होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.**




हवामान तज्ज्ञांच्या मते, एल निनो सक्रिय झाल्यास काही भागांत सरासरीपेक्षा कमी तर काही ठिकाणी अनियमित पाऊस पडू शकतो. त्यामुळे शेती, जलव्यवस्थापन, ऊर्जा, तसेच आपत्ती व्यवस्थापन या महत्त्वाच्या क्षेत्रांवर त्याचा परिणाम होऊ शकतो.

विशेषतः खरीप हंगामासाठी पावसाचे अनिश्चित स्वरूप चिंतेचे ठरू शकते. पेरणीचे वेळापत्रक, पिकांची निवड आणि जलसाठ्याचे नियोजन यासाठी प्रशासन आणि शेतकऱ्यांनी योग्य तयारी ठेवणे आवश्यक आहे. तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, येत्या काळात हवामानातील बदलांवर बारकाईने लक्ष ठेवणे आणि त्यानुसार नियोजन करणे अत्यावश्यक आहे. संभाव्य धोके टाळण्यासाठी आणि नुकसान कमी करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी सज्ज राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

राजस्थानच्या फालोदी येथे देशातील उच्चांकी ४४.८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. पूर्व मध्य प्रदेश आणि परिसरावर चक्राकार वारे वाहत असून, विदर्भापासून कोमोरीन भागापर्यंत हवेचा कमी दाबाचा पट्टा सक्रिय आहे.

### पुढच्या दोन दिवसात उन्हाचा तडाखा वाढणार

कोकणात उन्हाचा चटका वाढणार असून, पुढचे दोन दिवस मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांत उष्ण व दमट हवामानाची शक्यता आहे. तसेच लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांत वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता असल्याने सतर्कतेचा इशारा (येलो अलर्ट) देण्यात आला आहे. उर्वरित राज्यात कमाल तापमानात चढ-उतार होण्याची शक्यता असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे.

# राष्ट्रवादीला मोठा धक्का; शेवटच्या राज्यातूनही सत्तेबाहेर

**महाईन्यूज । मुंबई**

केरळ विधानसभा निवडणुकीच्या निकालांनी शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाला मोठा धक्का दिला आहे. या निकालांमुळे पक्ष देशातील शेवटच्या राज्यातूनही सत्तेबाहेर पडला असून, केरळमध्ये एकाही जागेवर विजय मिळवण्यात अपयश आले आहे.

डाव्या लोकशाही आघाडी (LDF) सोबत निवडणूक लढवूनही राष्ट्रवादीला मिळालेल्या तीनही जागांवर पराभव स्वीकारावा लागला. त्यामुळे विधानसभेतील पक्षाचे अस्तित्व पूर्णपणे संपुष्टात आले आहे.

या निवडणुकीत सर्वात मोठा धक्का म्हणजे विद्यमान मंत्री ए. के. ससींद्रन यांचा पराभव. एलाथूर मतदारसंघातून सलग चौथ्यांदा रिंगणात उतरलेल्या ससींद्रन यांना काँग्रेसच्या उमेदवाराने पराभूत केले. तसेच कुट्टानाड मतदारसंघात थॉमस के. थॉमस यांचाही पराभव झाला. मलप्पुरम मतदारसंघात राष्ट्रवादीचे उमेदवार मुजीब रहमान यांनाही पराभवाचा सामना करावा लागला. तिन्ही उमेदवारांना मिळून केवळ ०.६८ टक्के मते मिळाल्याने पक्षाची स्थिती अत्यंत कमकुवत झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

दरम्यान, केरळमध्ये सत्तास्थापनेसाठी काँग्रेसकडून हालचाली सुरू झाल्या असून निरीक्षक म्हणून अजय माकन आणि मुकुल वासनिक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विधिमंडळ नेत्याची निवड लवकरच होण्याची शक्यता आहे.

### केरळमध्ये राष्ट्रवादीला शून्य यश

केरळ विधानसभा निवडणुकीत शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा धक्का बसला असून पक्षाला एकाही जागेवर विजय मिळवता आला नाही. एलडीएफसोबत लढूनही तिन्ही उमेदवारांचा पराभव झाला. मंत्री ए. के. ससींद्रन यांच्यासह इतर आमदारांनाही मतदारांनी नाकारल्याने पक्ष देशातील शेवटच्या राज्यातूनही सत्तेबाहेर पडला आहे.

# पहिल्या ४५ दिवसांतील भाजपाचा अजेंडा

## लव्ह जिहाद, लँड जिहाद विरोधी कायदे आणि समान नागरी कायद्याची (UCC) अंमलबजावणी

**महाईन्यूज । पश्चिम बंगाल**

**नुकत्याच पार पडलेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत भाजपाला प्रचंड बहुमत मिळाले. १५ वर्षांपासून सत्तेत असलेल्या ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसचा पराभव झाला. आता भाजपाच्या नव्या सरकारसमोर अनेक आव्हाने आहेत. समान नागरी कायदा लागू करणे तसेच बांगलादेशातून होणारी घुसखोरी रोखणे या मुद्यांवर भाजपा नेत्यांनी जोर दिला आहे. सरकारकडून दिल्या जाणाऱ्या लाभाचे महिलांना थेट हस्तांतरण (DBT) करणे, सरकारी कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता देणे, ही कामे भाजपाच्या यादीत अग्रस्थानी आहेत.**



पश्चिम बंगालच्या विजयानंतर केलेल्या भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बांगलादेशातून होणारी घुसखोरी थांबवणार असल्याचे म्हटले. तसेच त्यांनी केंद्र सरकारची आयुष्यमान भारत योजना पश्चिम बंगालमध्ये लागू करणार असल्याची घोषणा केली. "मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आणून रोजगार निर्मिती करण्याचे ध्येय", भाजपाने ठेवले आहे. औद्योगिक, कृषी आणि शैक्षणिक क्षेत्रावर नव्या सरकारकडून जोर दिला जाणार आहे. नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर पहिल्या सहा महिन्यांत समान नागरी कायदा लागू करण्याचे ध्येय भाजपाने ठेवले आहे. भाजपाने यापूर्वी उत्तराखंडमध्ये समान नागरी कायदा लागू केला. तर गुजरातमध्ये विधेयक मंजूर केले आहे. पश्चिम बंगालच्या सीमांचे व समाजव्यवस्थेचे रक्षण करण्यासाठी "लव्ह जिहाद" आणि "लँड जिहाद" विरोधात कायदा करण्याची तयारी भाजपाने केली आहे. बांगलादेशातून होणाऱ्या घुसखोरीचा मुद्दा भाजपाने अनेक वर्षांपासून लावून धरला आहे. सरकार आल्यानंतर पहिल्या ४५ दिवसांत भारत – बांगलादेश सीमेवर तारेचे कुंपण लावले जाईल, असे आश्वासन भाजपाने दिले होते. तसेच घुसखोरांना बांगलादेशात पाठवले जाईल, असे आश्वासन देण्यात आले होते.

भाजपाचे नवीन सरकार आल्यानंतर टीएमसीच्या नेत्यांच्या घोटाळे व भ्रष्टाचाराचा तपास होण्याची शक्यता राजकीय वर्तुळात आहे. निकालाच्या दिवशी भाजपाला आघाडी मिळत असल्याचे दिसून आल्यानंतर पश्चिम बंगालच्या सचिवालयाबाहेर केंद्रीय सुरक्षा दल तैनात करण्यात आले होते. तसेच मुख्य सचिव दुष्यंत नरियाला यांनी सरकारी कार्यालयांमधून फाईल बाहेर नेण्यावर पूर्णपणे स्थगिती देणारे आदेश काढले होते.

भाजपाच्या जाहीरनाम्यात महिला आणि बेरोजगार युवकांना प्रति महिना ३ हजार रूपये देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. ममता बॅनर्जी यांनी सुरू केलेल्या लक्ष्मीर भंडार योजनेत महिलांना प्रति महिना १५०० रूपये (एससी, एसटी प्रवर्गातील महिलांना १७०० रूपये) दिले जात होते. तसेच बेरोजगार युवकांना प्रति महिना ३ हजार रूपये देण्याचे आश्वासन भाजपाने दिले आहे. त्याचबरोबर पुढील पाच वर्षांत एक कोटी नवीन रोजगार निर्माण करण्याचे आश्वासन देण्यात आले. ममता बॅनर्जी यांनी विधानसभा निवडणुकीच्या आधी युवा साथी योजना सुरू करून बेरोजगार युवकांना दीड हजार रूपये देणार असल्याची घोषणा केली होती. या योजनेसाठी आतापर्यंत सुमारे ८० लाख तरूणांनी अर्ज केला आहे. तर पेपर गळती आणि परीक्षा रद्द झाल्याने परीक्षार्थींचे होणारे नुकसान टाळण्यासाठी भाजपाने परीक्षार्थींची वयोमर्यादा पाच वर्षांनी वाढवण्याचे आश्वासन दिले आहे.

### वंदे मातरम म्युझियम आणि शक्तिपीठ सर्किट

भाजपच्या जाहीरनाम्यात पश्चिम बंगालचे ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित करण्यासाठी वंदे मातरम संग्रहालय उभारण्याचे आणि रवींद्रनाथ टागोर यांचा वारसा पुढे नेण्यासाठी सांस्कृतिक केंद्रे स्थापन करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. तसेच, सर्व शक्तिपीठांना जोडण्यासाठी 'शक्तिपीठ सर्किट' आणि भक्ती चळवळीचा सन्मान करण्यासाठी 'चैतन्य महाप्रभु आध्यात्मिक सर्किट' तयार करण्याचे आश्वासनही भाजपने दिले आहे. याशिवाय गंगासागर मेळा, महेशचा रथोत्सव, बारुणी मेळा आणि बंदना परब यांसारख्या सणांचा युनेस्कोच्या 'अमूर्त सांस्कृतिक वारसा' सूचीमध्ये समावेश करण्यासाठी प्रयत्न करण्याचे वचनही देण्यात आले आहे.

# 'सिंधू नदीचे पाणी रोखल्यास महागात पडेल!' पाकिस्तानची भारताला पोकळ धमकी

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**सिंधू पाणी कराराअंतर्गत पाकिस्तानच्या मालकीच्या पाण्याचा प्रवाह थांबवण्याचा किंवा वळवण्याचा कोणताही प्रयत्न युद्धाचे आव्हान देणारे मानले जाईल, असा धमकीचा इशारा पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री इशाक दार यांनी भारताला दिला आहे. भारताने असं काही करण्याचा प्रयत्न केला तर पाकिस्तान पूर्ण ताकदीनिशी त्यांना प्रत्युत्तर देईल असे त्यांनी म्हटले आहे.**



इशाक दार यांच्यासह मंगळवारी पाकिस्तानच्या अनेक नेत्यांनी आणि मंत्र्यांनी भारतावर कठोर टीका केली असून, भारताने देखील यावर चांगलेच उत्तर दिले आहे.

पाकिस्तानी मंत्री आणि नेत्यांसह, पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री इशाक दार यांच्याकडून मंगळवारी अनेक कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले होते. यावेळी परराष्ट्र मंत्रालयात सर्वांना त्यांनी भारतावर विजय मिळवल्याचा दावा केल्याचे सांगत, राजदूत आणि राजनयिक समुदायाच्या सदस्यांना संबोधताना भारतावर टीकेची झोड उठवली. ते म्हणाले, 'पाकिस्तानने भारताच्या हल्ल्याला दिलेल्या प्रत्युत्तराने सार्वभौमत्व, प्रादेशिक अखंडता आणि राजकीय स्वातंत्र्याच्या तत्वांप्रति असलेली वचनबद्धता दाखवून दिली आहे.'

2025 साली झालेल्या पहलगाम हल्ल्यानंतर भारताने सिंधू पाणी करार एकतर्फी निलंबित करण्याच्या निर्णयाचा निषेध करत, हे प्रस्थापित नियमांचे उल्लंघन आहे असा आरोप इशाक दार यांनी भारतावर केले आहेत. ते म्हणाले, 'भारताची ही कृती जाणीवपूर्वक आखलेल्या रणनीतीचा भाग होती, ज्यामध्ये कोणतेही पुरावे नसताना पाकिस्तानवर आरोप करणे आणि युद्धाची चेतावणी देणारे वक्तव्य करणे यांचा समावेश होता.' ते असेही म्हणाले की, 'भारताने पाकिस्तानच्या वाट्याचे पाणी रोखण्याचा किंवा वळवण्याचा प्रयत्न युद्धजन्य कृत्य मानले जाईल.'

### पाकिस्तानच्या पोकळ धमक्यांवर भारताचे प्रत्युत्तर

यावर प्रत्युत्तर देताना, 'रक्त आणि पाणी एकत्र वाहू शकत नाहीत' अशी भूमिका भारताने मांडली आहे. भारत सरकारने स्पष्ट केले आहे की, जोपर्यंत पाकिस्तान सीमेपलीकडील दहशतवादाला पाठिंबा देणे कायमस्वरूपी बंद करत नाही, तोपर्यंत हा करार स्थगित राहील. भारताने पाकिस्तानच्या या पोकळ धमकीला बेधडक उत्तर देत, सिंधू नदीच्या करारावर मर्यादा आणण्याची भूमिका कायम ठेवत पाकिस्तानला चांगलीच अद्दल घडवली आहे. भारताच्या या ठाम भूमिकेमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावरही दहशतवादाविरोधात कडक संदेश गेला आहे.

# वय फक्त आकडा!



टीव्ही इंडस्ट्रीतील लोकप्रिय अभिनेत्री श्वेता तिवारी (Shweta Tiwari ) पुन्हा एकदा तिच्या स्टायलिश आणि आकर्षक लुकमुळे चर्चेत आली आहे. ४५ व्या वर्षीही तिची सुंदरता आणि फिटनेस पाहून अनेक जण थक्क झाले आहेत. अलीकडेच श्वेताने तिच्या सोशल मीडियावर काही फोटो शेअर केले, ज्यामध्ये ती साडीत खूपच सुंदर दिसत आहे. या फोटोवर चाहत्यांकडून भरभरून प्रतिक्रिया येत आहेत. श्वेता तिवारी नेहमीच तिच्या वेगवेगळ्या लुक्समुळे चर्चेत असते. जरी ती सध्या टीव्हीवर कमी दिसत असली तरी सोशल मीडियावर ती खूप सक्रिय आहे. तिचे नवे फोटो आणि व्हिडिओ सतत चाहत्यांचे लक्ष वेधून घेत असतात. यावेळीही तिच्या साडीतील लुकने सोशल मीडियावर धुमाकूळ घातला आहे. या फोटोंमध्ये श्वेता तिवारीने गोल्डन रंगाची सुंदर साडी परिधान केली आहे. ही साडी तिने अतिशय ग्रेसफुल पद्धतीने नेसली आहे. साडीच्या बॉर्डरवर केलेले गोल्डन एम्ब्रॉयडरी डिझाइन तिच्या लुकला अधिक आकर्षक बनवत आहे. यासोबत तिने डार्क ब्लू रंगाचा डीप नेक ब्लाउज घातला आहे. या ब्लाउजवरही गोल्डन एम्ब्रॉयडरी असून संपूर्ण लुक खूपच एलिगंट दिसत आहे. श्वेताने तिच्या या साडी लुकसोबत हेवी गोल्डन ज्वेलरी परिधान केली आहे. मोठे झुमके, गळ्यातील जड नेकलेस आणि हातात साधे कडे असा तिचा लुक पूर्ण झाला आहे. तिच्या या पारंपरिक अवतारात एक वेगळीच झलक पाहायला मिळत आहे. त्यातच तिने कपाळावर लावलेली लाल रंगाची बिंदी तिच्या सौंदर्यात भर घालत आहे. श्वेताच्या या फोटोंवर चाहत्यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. अनेकांनी तिच्या सौंदर्याची तुलना तरुण अभिनेत्रींसोबत करत तिला “संतूर मम्मी” असे मजेशीर कॉम्प्लिमेंट्स दिले आहेत. ४५ व्या वर्षीही ती २५ वर्षांच्या अभिनेत्रींसारखी दिसते, असेही अनेकांनी म्हटले आहे. श्वेता तिवारीने तिच्या करिअरमध्ये अनेक लोकप्रिय मालिकांमध्ये काम केले आहे.



## जे समोर दिसतं ते वास्तव की भास?

मराठमोळी अभिनेत्री पूजा सावंत नव्या चित्रपटाद्वारे प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. ‘दृश्य-अदृश्य ‘ या तिच्या आगामी सिनेमाचे पोस्टर अलिकडेच प्रदर्शित झाले. पोस्टरमध्ये पूजाच्या नजरेतला गोंधळ, भीती आणि शोध ‘दृश्य-अदृश्य’च्या कथानकाचा गाभा अधोरेखित करते. तिच्या मागे पोलिसी वेशात अशोक समर्थ पाहायला मिळत आहे. या सिनेमाविषयी पूजा म्हणाली, ‘दृश्य-अदृश्य’ हा माझ्यासाठी केवळ एक सिनेमा नाही, तर माझ्या आतला प्रवास आहे. आपण जे पाहतो, त्यावर सहज विश्वास ठेवतो, पण या कथेनं मला शिकवलं, की प्रत्येक सत्याच्या मागे काहीतरी दडलेलं असतं, जे सहसा दिसत नाही. प्रेक्षक हा चित्रपट पाहतील, तेव्हा ते स्वतःच्या अनुभवांशीही जोडले जातील. कदाचित त्या क्षणी ‘दृश्य’ आणि ‘अदृश्य’ यांच्यातली रेषा त्यांच्यासाठीही धूसर होईल.’ आरएसटी कॅनव्हास निर्मित या सस्पेन्स थ्रिलरचं दिग्दर्शन मिलिंद लेले यांनी केलं आहे, तसेच कथा-पटकथाही त्यांनीच लिहिली आहे. पूजासोबत सिनेमात अशोक समर्थ, सुव्रत जोशी, हार्दिक जोशी, अक्षया गुरव, विद्याधर जोशी आणि केया इंगळे आदी कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. येत्या १९ जून रोजी हा सिनेमा प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाच्या पोस्टरनेच प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण केली असून सोशल मीडियावर त्याची मोठी चर्चा रंगत आहे. ‘दृश्य-अदृश्य’ हा सस्पेन्स थ्रिलर असल्यामुळे कथानकात अनेक अनपेक्षित वळणं पाहायला मिळणार असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पूजाच्या अभिनयातील नवे पैलू या चित्रपटातून प्रेक्षकांना अनुभवायला मिळणार आहेत. दिग्दर्शक मिलिंद लेले यांची वेगळी मांडणी आणि कथनशैलीही या सिनेमाची खासियत ठरणार आहे. मराठी चित्रपटसृष्टीत दर्जेदार थ्रिलर म्हणून हा सिनेमा नक्कीच आपली वेगळी छाप सोडेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



# बॉबीचा कूल अंदाज! नव्या चित्रपटातील लूक

ॲनिमल या चित्रपटातील एका वेगळ्या भूमिकेनंतर अभिनेता बॉबी देओलच्या करिअरला बुस्ट मिळाला. या चित्रपटाच्या अभूतपूर्व यशानंतर बॉबीला अनेक चित्रपटांच्या ऑफर्स मिळाल्या. ॲनिमल या चित्रपटातील एका वेगळ्या भूमिकेनंतर अभिनेता बॉबी देओलच्या करिअरला बुस्ट मिळाला. या चित्रपटाच्या अभूतपूर्व यशानंतर बॉबीला अनेक चित्रपटांच्या ऑफर्स मिळाल्या. अखेर या चित्रपटाचे दुसरे पोस्टर रिलीज करण्यात आले असून, बॉबी देओलचा लूक रिव्हील करण्यात आला आहे. तसेच चित्रपटाच्या रिलीज डेटचीही घोषणा करण्यात आली आहे. त्यामुळे बॉबीच्या चाहत्यांना या चित्रपटाविषयी मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. बंदरच्या नवीन पोस्टरमध्ये बॉबी कूल अंदाजात दिसत आहे. हातात गिटार समोर माईक आणि वेगळ्या वेशभूषेत असल्यामुळे ९० च्या दशकातील चित्रपटांची आठवण येते. ‘बंदर’चा टीझर ७ मे रोजी सकाळी ११ वाजता प्रदर्शित होणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. या टीझरसाठी बॉबीच्या चाहत्यांमध्ये उत्सुकता आहे. या चित्रपटात बॉबी देओलसह सान्या मल्होत्रा, सपना पब्बी, सबा आझाद, इंद्रजित सुकुमारन, जितेंद्र जोशी, राज बी. शेट्टी आणि नागेश भोसले या कलाकारांच्याही महत्वाच्या भूमिका आहेत. चित्रपटाचे लेखन सुदीप शर्मा आणि अभिषेक बॅनर्जी यांनी केले असून, दिग्दर्शन अनुराग कश्यप यांनी केले आहे. तर चित्रपटाची निर्मिती निखिल द्विवेदी यांच्या ‘सॅफ्रन मॅजिक वर्क्स’ या निर्मिती संस्थेअंतर्गत झाली आहे. हा चित्रपट ५ जून रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. दरम्यान, बॉबी देओलच्या या नव्या लूकमुळे सोशल मीडियावर मोठी चर्चा रंगली आहे. अनेक चाहत्यांनी त्याच्या या ट्रान्सफॉर्मेशनचे कौतुक करत टीझरची आतुरतेने वाट पाहत असल्याचे सांगितले आहे. तसेच ‘बंदर’ हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर दमदार कामगिरी करेल, असा अंदाजही व्यक्त केला जात आहे.

# मणिपूर, छत्तीसगड उपांत्यपूर्व फेरीच्या समीप

## कर्नाटकचा संघाही उपांत्यपूर्व फेरीच्या उंबरठ्यावर


**महाईन्यूज । रायपूर**

**येथे सुरू असलेल्या 2026 च्या स्वामी विवेकानंद चषक 20 वर्षांखालील वयोगटातील पुरूषांच्या राष्ट्रीय फुटबॉल चॅम्पियनशिप स्पर्धेत मणिपूर आणि छत्तीसगड यांनी उपांत्यपूर्व फेरीच्या समीप वाटचाल केली आहे. तसेच कर्नाटकचा संघाही उपांत्यपूर्व फेरीच्या उंबरठ्यावर आहे.**




ब गटातील झालेल्या सामन्यात मणिपूरने दादरा-नगर हवेली दमन-दिव संघाचा 7-0 अशा गोलफरकाने एकतर्फी पराभव केला. या विजयामुळे ब गटात आता मणिपूरने आघाडीचे स्थान मिळविले आहे. इ गटातील झालेला नागालँड आणि छत्तीसगड यांच्यातील सामना बरोबरीत राहिला. सदर स्पर्धा येथील रामकृष्ण मिशन आश्रमच्या मैदानावर खेळविली जात आहे.

मणिपूर आणि दादरा-नगर हवेली यांच्यातील सामन्यात मणिपूर संघातील सलाम मेताईने पूर्वार्धातच शानदार हॅट्रीक साधली. तर चानम आकाश मेताई तसेच एस. गुइथोबा, वाहेंगबाम जॅक सिंग आणि के. कार्लोस सिंग यांनी प्रत्येकी 1 गोल केला. ब गटातील अन्य एका सामन्यात नागालँडने यजमान छत्तीसगडला 1-1 असे बरोबरीत रोखले. या सामन्यात छत्तीसगडतर्फे इंद्रजित रॉयने तर नागालँडतर्फे अचुमीने प्रत्येकी 1 गोल केला. ब गटात आता मणिपूरचा संघ दोन सामन्यांतून 6 गुणांसह अग्रस्थानावर आहे. तर छत्तीसगडचा संघ चार गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. आता या दोन संघात ब गटातील लढत बुधवारी होणार आहे. मणिपूरचे उपांत्यपूर्व फेरीतील स्थान जवळपास निश्चित झाले आहे. तर यजमान छत्तीसगडला उपांत्यपूर्व फेरी गाठण्यासाठी शेवटच्या सामन्यात विजय मिळविणे जरुरीचे आहे.




# पाकिस्तानचा संघ भारतात खेळण्याचा मार्ग मोकळा; केंद्र सरकारच नवं धोरण

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या वर्षपूर्तीच्या निमित्ताने केंद्र सरकारने पाकिस्तानचे संघ आणि क्रीडापटूंसंदर्भात धोरण जारी केलं आहे. विविध खेळांच्या आंतरराष्ट्रीय संघटनांर्फे आयोजित बहुदेशीय स्पर्धांसाठी पाकिस्तानचा संघ भारतात येऊन खेळू शकतो असं केंद्र सरकारने स्पष्ट केलं आहे. मात्र भारत-पाकिस्तान उभय देशांमध्ये कोणत्याही स्वरुपाची मालिका आयोजित केली जाणार नाही हेही केंद्र सरकारने स्पष्ट केलं.**




### तणावपूर्ण संबंधांमुळे निर्णय

भारत सरकारने स्पष्ट केले आहे की, दोन्ही देशांमध्ये आयोजित केल्या जाणाऱ्या द्विपक्षीय क्रीडा स्पर्धांमध्ये कुणीही सहभागी होणार नाही. भारतीय संघ पाकिस्तानात जाऊन खेळणार नाही आणि पाकिस्तानी संघांनाही भारतात खेळण्याची परवानगी दिली जाणार नाही. सीमापार दहशतवाद आणि दोन्ही देशांमधील तणावपूर्ण संबंधांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. महत्त्वाचे म्हणजे, वर्ल्डकप, चॅम्पियन्स ट्रॉफी यांसारख्या आंतरराष्ट्रीय क्रीडा संघटनांतर्गत भारतात आयोजित होणाऱ्या स्पर्धांमध्ये पाकिस्तानी खेळाडू सहभागी होऊ शकतील. आंतरराष्ट्रीय क्रीडा संस्थांच्या नियमांचे पालन करणे आणि स्पर्धा सुरळीत पार पाडणे या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे.

५ मे रोजी जारी करण्यात आलेल्या निर्देशांनुसार, पाकिस्तानचे संघ आणि खेळाडू भारतात होणाऱ्या बहुदेशीय स्पर्धांमध्ये सहभागी होऊ शकतील. खेळाडू, तांत्रिक अधिकारी आणि आंतरराष्ट्रीय संघटनांचे प्रतिनिधी यांना भारतात स्पर्धेसाठी येण्याद्दष्टीने सुलभपणे व्हिसा मिळू शकेल अशी तरतूद करण्यात आली आहे.

भारत-पाकिस्तान देशांदरम्यानच्या मालिका आणि बहुविध देशांची स्पर्धा यातला फरक केंद्र सरकारने अधोरेखित केला आहे. भारतीय संघ पाकिस्तानात कोणत्याही खेळाची मालिका अथवा सामने खेळण्यासाठी जाणार नाही याचा पुनरुच्चार केंद्र सरकारने केला. त्याचप्रमाणे पाकिस्तानचा संघ कोणत्याही खेळातल्या मालिकेशी फक्त भारताविरुद्ध खेळण्यासाठी भारतात येऊ शकणार नाही. मात्र बहुविध देशांच्या स्पर्धेची परिमाणं वेगळी असतात. त्यामुळे अपवादात्मक परिस्थिती म्हणून पाकिस्तानच्या संघांना, खेळाडूंना अशा स्पर्धांसाठी भारतात प्रवेश दिला जाईल असं केंद्र सरकारने म्हटले आहे.

अशा स्पर्धांमध्ये पाकिस्तानचा संघ त्या स्पर्धेत भारताचा संघही सहभागी होईल असं केंद्र सरकारने म्हटलं आहे. हॉकी असो किंवा स्क्वॉश किंवा अन्य कोणताही खेळ- अनेक देश सहभागी होत असलेली स्पर्धा असेल तर पाकिस्तानच्या संघासाठी भारतात येणं जिकिरीचं व्हायचं. पण नव्या धोरणामुळे पाकिस्तानचा संघ अशा स्पर्धांमध्ये सहजपणे सहभागी होऊ शकेल. विविध खेळांच्या आंतरराष्ट्रीय संघटना तसंच ऑलिम्पिक आयोजन समिती, कॉमनवेल्थ संयोजन समिती तसंच आशियाई क्रीडा स्पर्धा या संघटनांच्या तत्वांशी आम्ही कटिबद्ध आहोत असं केंद्र सरकारने म्हटलं आहे. नवं धोरण लागू करण्यामागे केंद्र सरकारने भविष्याचा विचार केला आहे. २०३० मध्ये भारतात कॉमनवेल्थ स्पर्धा होणार आहे. २०३६ ऑलिम्पिक साठी भारताने आवेदन सादर केलं आहे. २०३८ आशियाई स्पर्धेसाठीही भारत उत्सुक आहे. ऑलिम्पिक काऊंसिल ऑफ एशियाचे प्रतिनिधी काही महिन्यातच भारताचा दौरा करणार आहेत. २०२९ मध्ये चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा भारतात होणार आहे तर २०३१ मध्ये वनडे वर्ल्डकप भारतात होणार आहे. या सगळ्या स्पर्धा बहुदेशीय असल्यामुळे पाकिस्तानचा संघ भारतात येऊन खेळू शकतो. यामुळे क्रीडा क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची विश्वासार्हता अधिक मजबूत होणार आहे. तसेच, बहुदेशीय स्पर्धांचे आयोजन सुरळीत पार पाडण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
# महाईन्यूज™
ePaper
। गुरुवार ।
दि. 07 मे 2026 ।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# पिंपरी-चिंचवडमध्ये स्पोर्ट्स युनिव्हर्सिटी उभारणीचा प्रस्ताव

महाईन्यूज ।
पिंपरी- चिंचवड

**शहराला क्रीडा क्षेत्रात नवी ओळख मिळवून देण्यासाठी "स्पोर्ट्स सिटी" बनवण्याचा महत्त्वाकांक्षी प्रस्ताव पुढे आला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत नगरसेविका कविता भोंगाळे यांनी शहरात अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज "स्पोर्ट्स युनिव्हर्सिटी" उभारण्याची आग्रही मागणी केली.**

भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली मांडलेल्या या प्रस्तावात शहराच्या सर्वांगीण विकासाचा दूरदृष्टीपूर्ण विचार मांडण्यात आला. पिंपरी चिंचवड हे औद्योगिक आणि शैक्षणिक क्षेत्रात वेगाने प्रगती करत असताना क्रीडा क्षेत्रातही मोठी झेप घेण्याची क्षमता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या प्रस्तावित स्पोर्ट्स युनिव्हर्सिटीमध्ये प्रशिक्षणासाठी आधुनिक पायाभूत सुविधा, अनुभवी प्रशिक्षक, तसेच शैक्षणिक संधी एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला आहे. यामुळे शहरातील खेळाडूंना व्यावसायिक मार्गदर्शन मिळून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकण्याची संधी उपलब्ध होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. ऑलिम्पिकसारख्या स्पर्धांमध्ये पदके

> "पिंपरी चिंचवडमधील प्रत्येक प्रतिभावान खेळाडूला जागतिक दर्जाच्या सुविधा आणि योग्य मार्गदर्शन मिळाले, तर आपल्या शहरातून ऑलिम्पिक पदक विजेते घडणे अशक्य नाही. स्पोर्ट्स युनिव्हर्सिटीच्या माध्यमातून आपण क्रीडा क्षेत्राला नवी दिशा देत, तरुणांना उज्ज्वल आणि सन्माननीय भविष्याची हमी देण्यासाठी आम्ही आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पाठपुरावा करीत आहेत.
>
> - कविता भोंगाळे,
> नगरसेविका, भाजपा, पिंपरी-चिंचवड महापालिका.

जिंकणारे खेळाडू घडवण्याचे स्वप्न साकार करण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरेल, असेही भोंगाळे पाटील यांनी नमूद केले. त्याचबरोबर राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना महानगरपालिकेत योग्य पदांवर नियुक्त करून त्यांचा सन्मान करण्याची मागणीही त्यांनी सभागृहात मांडली. या उपक्रमामुळे शहरात क्रीडा संस्कृतीला चालना मिळेल, तरुण पिढीला प्रेरणा मिळेल आणि क्रीडा क्षेत्राला स्थिर करिअर म्हणून मान्यता मिळेल, असे मत त्यांनी व्यक्त केले. शहराच्या उज्ज्वल भविष्यासाठी हा प्रस्ताव तातडीने मंजूर करून स्पोर्ट्स युनिव्हर्सिटी उभारणीबाबत ठोस निर्णय घेण्याची मागणी प्रशासनाकडे करण्यात आली आहे. पिंपरी चिंचवडला "स्पोर्ट्स सिटी" म्हणून जागतिक स्तरावर ओळख मिळवून देण्याच्या दिशेने हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.







# कायदा सुव्यवस्थेसाठी कृती आराखडा हवा

## अत्याचाराच्या घटनांचा सर्वसाधारण सभेत निषेध; गंभीर गुन्ह्यांमध्ये पोलिसांनी स्वतःहून फिर्यादी होण्याची मागणी

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**भोर तालुक्यातील नसरापूर येथे घडलेल्या अत्याचाराच्या घटनेने संपूर्ण शहर हादरले असून, या घटनेचे अत्यंत तीव्र पडसाद पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत उमटले. या अमानवीय घटनेचा निषेध करत असतानाच, शहरातील ढासळलेल्या कायदा व सुव्यवस्थेबाबत नगरसेवकांनी प्रशासनाला धारेवर धरले. महापौर रवी लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली सर्वसाधारण सभा पार पडली.**



या सभेत, शहरातील महिलांची सुरक्षा आणि गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यासाठी महापालिका आयुक्त आणि पोलीस आयुक्त यांनी तातडीने संयुक्त बैठक घेऊन ठोस कृती आराखडा तयार करावा, अशी आग्रही मागणी स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी केली.

सभेला संबोधित करताना अभिषेक बारणे यांनी अत्यंत भावूक आणि आक्रमक भूमिका मांडली. ते म्हणाले की, नसरापूरची घटना केवळ हृदय पिळवटून टाकणारी नसून ती समाजाच्या संवेदनशीलतेवर मोठा आघात आहे. अशा घटनांमध्ये बळी पडलेल्या कुटुंबांची अवस्था काय असेल, याची कल्पनाही करवत नाही. अनेकदा पीडित कुटुंबावर सामाजिक किंवा इतर दबाव असतो, त्यामुळे अशा गंभीर गुन्ह्यांमध्ये पोलिसांनी केवळ तक्रारीची वाट न पाहता स्वतःहून फिर्यादीची भूमिका पार पाडावी, जेणेकरून खटला अधिक मजबूत होईल आणि गुन्हेगारांना फाशीसारखी कठोर शिक्षा मिळेल.

शहरातील वाढत्या गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यासाठी स्थानिक पातळीवर प्रभावी यंत्रणा राबवण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले. शहरात मोठ्या प्रमाणावर परप्रांतीय आणि नवीन लोक वास्तव्यास येत असतात, त्यामुळे शहरातील सर्व भाडेकरूंची अधिकृत नोंदणी होणे आता अनिवार्य झाले आहे. या प्रक्रियेत दिरंगाई होता कामा नये. तसेच, नसरापूर घटनेच्या तपासात काय निष्पन्न झाले आणि न्यायालयीन निकालाची सद्यस्थिती काय आहे, याची सविस्तर माहिती महापालिकेच्या कायदा विभागाने संकलित करावी. शहरातील सर्व १२८ विद्यमान नगरसेवकांना या निकालाची माहिती मिळायला हवी, कारण प्रभागातील नागरिक आपल्या लोकप्रतिनिधींना जाब विचारत असतात आणि त्या ठिकाणी उत्तर देणे नगरसेवकांना कठीण जात आहे.

### केवळ आश्वासन नको, ठोस कृती हवी..!

परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता, पोलीस आयुक्त आणि महापालिका आयुक्त यांनी एकमेकांशी समन्वय साधून शहरातील कायदा व सुव्यवस्थेबाबत व्यापक चर्चा करावी. केवळ आश्वासन नको तर जमिनीवर ठोस उपाययोजना दिसल्या पाहिजेत, असा इशाराही यावेळी देण्यात आला. सभेच्या शेवटी, नसरापूर घटनेशी संबंधित सर्व माहिती आणि प्रशासनाने केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल पुढील बैठक आयोजित करण्यापूर्वी सभागृहासमोर सादर करावा, असे आदेशही देण्यात आले. या चर्चेत शहरातील इतर नगरसेवकांनीही सहभाग घेत महिला सुरक्षा आणि पोलीस गस्त वाढवण्याची मागणी लावून धरली.

# महापालिका आरोग्य वैद्यकीय समितीला मंजुरी; महापौर लांडगे यांची मान्यता

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमध्ये शहरातील वाढत्या आरोग्यविषयक समस्या आणि तातडीच्या वैद्यकीय सेवांच्या गरजा लक्षात घेऊन "आरोग्य व वैद्यकीय समिती" स्थापन करण्यास सर्वसाधारण सभेत मंजुरी देण्यात आली. या निर्णयामुळे शहरातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला अधिक बळकटी मिळणार असून, आरोग्य सेवा अधिक गतिमान आणि लोककेंद्रित होण्यास मदत होणार आहे.**



भाजपा नगरसेवक तथा प्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ डॉ. सुहास कांबळे यांनी या समितीच्या स्थापनेसाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या मांडणीनंतर आणि सभागृहातील चर्चेनंतर हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. या प्रस्तावाला महापौर लांडगे यांनी मान्यता दिली असून, माजी महापौर घोडेकर यांनी त्यास अनुमोदन दिले.

सभागृहात बोलताना डॉ. सुहास कांबळे यांनी सांगितले की, शहरातील सुमारे ४० लाख नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित हा अत्यंत महत्त्वाचा विषय असून वाढते नागरीकरण, संसर्गजन्य आजार आणि तातडीच्या वैद्यकीय गरजा लक्षात घेता स्वतंत्र समितीची स्थापना ही काळाची गरज होती. या समितीमुळे आरोग्य विषयक निर्णय अधिक वेगाने आणि समन्वयाने घेतले जातील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या विषयासाठी योगदान दिलेल्या सर्व लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि अभ्यासकांचे त्यांनी आभार मानले. तसेच आमदार महेशदादा लांडगे यांच्या मार्गदर्शनामुळे या प्रस्तावाला योग्य दिशा मिळाल्याचेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, समितीची रचना, कार्यपद्धती आणि अधिकार निश्चित करण्यासाठी आरोग्य क्षेत्रातील तज्ञ व वरिष्ठ प्रशासन अधिकाऱ्यांचा समावेश असलेली स्वतंत्र समिति तातडीने नियुक्त करावी, अशी मागणीही डॉ. कांबळे यांनी केली आहे. या निर्णयामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील आरोग्य व्यवस्थेला नवी दिशा मिळणार असल्याचे मानले जात आहे.

> “ पिंपरी-चिंचवड शहरातील प्रत्येक नागरिकाला वेळेवर, दर्जेदार आणि सुलभ आरोग्यसेवा मिळावी, हेच आमचे ध्येय आहे. आरोग्य व वैद्यकीय समितीच्या माध्यमातून आपण प्रशासन अधिक गतिमान, समन्वयित आणि लोककेंद्रित करू. हे केवळ एक पाऊल नाही, तर शहराच्या आरोग्य भविष्यासाठी एक ठोस दिशा आहे. या ऐतिहासिक निर्णयाबाबत मी सभागृहाचे आभार व्यक्त करतो.
>
> - डॉ. सुहास कांबळे, नगरसेवक, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# पिंपरी-चिंचवडकरांना विषारी पाणी; नागरी आरोग्य धोक्यात!

## शिवसेना गटनेते विश्वजित बारणे यांनी प्रशासनाला झापले; महापालिका आयुक्त यांचा सभागृहात खुलासा

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**पवना नदीतील पाणी धोकादायक पातळीपर्यंत प्रदूषित झाल्याचा धक्कादायक अहवाल समोर आल्यानंतर पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या (PCMC) सभागृहात यावर जोरदार चर्चा झाली. नीटल लॅबोरेटरीजच्या तपासणी अहवालात रावेत बंधारा परिसरातील पाण्यात गंभीर जैविक आणि रासायनिक प्रदूषण आढळल्याने नागरिकांच्या आरोग्यावर मोठा धोका निर्माण झाल्याचा मुद्दा शिवसेना शिंदे गटाचे गटनेते विश्वजित बारणे यांनी सभागृहात प्रभावीपणे मांडला. प्रशासनाला त्यांनी अक्षरशः झापले.**



पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत शिवसेना गटनेते विश्वजित बारणे यांनी तीव्र शब्दांत हल्लाबोल केला. सभागृहात सादर झालेल्या माहितीनुसार, पाण्यात खालील गंभीर बाबी आढळल्या आहेत: यामध्ये Total Coliform – 1600 MPN/100 ml (मानक 500 पेक्षा तिप्पट जास्त) मलमूत्रजन्य प्रदूषण अत्यंत जास्त प्रमाणात असल्याचे स्पष्ट, Dissolved Oxygen (DO) – 1 mg/l पेक्षा कमी (मानक 5 mg/l), नदीतील जलचर जीवसृष्टी धोक्यात, पाणी 'मृत अवस्थेकडे', BOD – 14 mg/l (मानक 3 mg/l), सांडपाणी व सेंद्रिय घाण मोठ्या प्रमाणात मिसळल्याचे संकेत, COD – 76.8 mg/l आणि औद्योगिक व रासायनिक कचऱ्यामुळे पाणी अत्यंत प्रदूषित आहे. तसेच, अहवालात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, हे पाणी "Required Limits नुसार अनुपयुक्त" आहे.

### आरोग्य व पर्यावरणावर गंभीर परिणाम

पाणी प्रक्रिया आणि संवर्धन क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते अशा प्रकारच्या प्रदूषित पाण्यामुळे नागरिकांमध्ये टायफॉईड, कॉलरा, कावीळ, त्वचारोग, जुलाब यांसारख्या आजारांचा धोका वाढतो. तसेच नदीतील ऑक्सिजन कमी झाल्याने जलचर जीवसृष्टीवर गंभीर परिणाम होऊन संपूर्ण पर्यावरणीय संतुलन बिघडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सभागृहात बोलताना विश्वजित बारणे यांनी प्रशासनाला धारेवर धरत अनेक प्रश्न उपस्थित केले. पवना नदीत सांडपाणी किती प्रमाणात सोडले जाते, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP) पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत का, तसेच नदी स्वच्छतेसाठी खर्च केलेला निधी नेमका कुठे वापरला जातो, असे प्रश्न त्यांनी उपस्थित केले. "नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू आहे. स्वच्छ पाणी देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे," असा आरोपही त्यांनी केला.

" पवना नदीतील पाणी इतक्या धोकादायक पातळीपर्यंत प्रदूषित झाले असताना प्रशासनाची निष्क्रियता चिंताजनक आहे. नागरिकांच्या आरोग्याशी असा खेळ अजिबात सहन केला जाणार नाही. स्वच्छ आणि सुरक्षित पाणी पुरवणे ही महापालिकेची मूलभूत जबाबदारी आहे; त्यासाठी तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात.

— विश्वजित बारणे, गटनेता, शिवसेना, पिंपरी-चिंचवड महापालिका.

### पूर्ण प्रक्रिया करुनच पाणी पुरवठा

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी स्पष्ट केले की, बंधाऱ्याच्या वरील भागातील गावांमधून कोणतीही प्रक्रिया न करता सांडपाणी थेट नदीपात्रात मिसळते. त्यामुळे पाण्याची गुणवत्ता मोठ्या प्रमाणात घसरली आहे.ते म्हणाले, "सध्यस्थितीत आपल्याकडे पर्याय नाही. त्यामुळे बंधाऱ्यातील पाणी घ्यावे लागते. मात्र हे पाणी पूर्णपणे प्रक्रिया करूनच नागरिकांना पुरवले जाते." पिंपरी-चिंचवड महापालिका अंतर्गत आणि पीएमआरडीए क्षेत्रातील गावांमध्ये सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP) उभारणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले. हे प्रकल्प सुरू होईपर्यंत नदीत मिसळणारे सांडपाणी ही समस्या कायम राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पवना नदीतील पाण्याच्या गंभीर प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर आणि वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर सभागृहात झालेल्या चर्चेत महत्त्वाचे मुद्दे समोर आले. शहराला सध्या सुमारे १२० एमएलडी पाण्याची कमतरता भासत असून, बंधाऱ्यातील पाणी प्रदूषित असले तरी पर्याय नसल्याने तेच पाणी घ्यावे लागत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

# कुस्तीपटू प्रगती गायकवाडच्या जिद्दीला आता महापालिकेची "साथ"

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू कु. प्रगती विनोद गायकवाड हिच्या क्रीडा कारकिर्दीला आर्थिक व संस्थात्मक पाठबळ देण्याबाबत महापालिकेकडून सकारात्मक भूमिका घेण्यात आली आहे. चिखली परिसरातील 19 वर्षीय प्रगतीने अल्पावधीतच आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करत शहराचे नाव उज्ज्वल केले आहे.**



" प्रगती गायकवाड ही केवळ पिंपरी-चिंचवड शहराची नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राची अभिमानाची खेळाडू आहे. तिने अत्यंत कठीण परिस्थितीतही राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सातत्याने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. अशा गुणवंत खेळाडूंना आर्थिक अडचणींमुळे थांबू द्यायचे नाही, हीच आमची भूमिका आहे. त्यामुळे महापालिकेने तिला तातडीने विशेष आर्थिक सहाय्य, प्रशिक्षण सुविधा आणि सर्व आवश्यक पाठबळ द्यावे, अशी आमची ठाम मागणी आहे. योग्य संधी मिळाल्यास प्रगती निश्चितच ऑलिंपिक स्तरावर भारतासाठी पदक जिंकू शकते.

- योगीता नागरगोजे, नगरसेविका, भाजपा, पिंपरी-चिंचवड महापालिका.

महापालिकेच्या सभागृहात झालेल्या चर्चेदरम्यान भाजपा नगरसेविका योगीता नागरगोजे यांनी प्रगती गायकवाड हिच्या क्रीडा प्रवासाबाबत सविस्तर माहिती देत तिला विशेष आर्थिक सहाय्य, शिष्यवृत्ती, प्रशिक्षण सुविधा तसेच आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी आवश्यक प्रायोजकत्व देण्याची मागणी केली.

यावेळी प्रगतीच्या कामगिरीचा गौरव करत, महापौर रवि लांडगे यांनी तिला महापालिकेकडून सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असे आश्वासन दिले. तिच्या क्रीडा विकासासाठी आवश्यक त्या सर्व योजनांचा समावेश करून मदत केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

प्रगती गायकवाडने आतापर्यंत 2026 ची महिला महाराष्ट्र केसरी (62 किलो गट) सुवर्णपदक, 2025 मधील व्हिएतनाम येथे झालेल्या सीनियर आशियाई कुस्ती स्पर्धेत रौप्यपदक, तसेच राष्ट्रीय स्तरावर 15 पेक्षा अधिक पदके मिळवून आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. खेलो इंडिया युनिव्हर्सिटी स्पर्धेत सुवर्णपदक आणि सीनियर राष्ट्रीय स्तरावर तृतीय क्रमांक मिळवत तिने सातत्यपूर्ण कामगिरी नोंदवली आहे.

सध्या आर्थिक मर्यादांमुळे तिच्या आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण, पोषण आहार व स्पर्धात्मक तयारीत अडथळे येत असल्याचे निदर्शनास आणण्यात आले. या पार्श्वभूमीवर महापालिकेने पुढाकार घेतल्यास ती भविष्यात ऑलिंपिकसारख्या जागतिक स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करू शकते, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

दरम्यान, महापालिकेकडून तिला विशेष खेळाडू सहाय्य योजनेत समाविष्ट करणे, मासिक शिष्यवृत्ती, प्रशिक्षण सुविधा तसेच "क्रीडा ब्रँड ॲम्बेसेडर" म्हणून सन्मान देण्याच्या मागणीलाही सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचे समजते. प्रगती गायकवाडसारख्या युवा खेळाडूंना वेळेवर दिलेले पाठबळ हे केवळ मदत नसून शहराच्या क्रीडा भविष्यातील महत्त्वाची गुंतवणूक असल्याचे मतही या निमित्ताने व्यक्त करण्यात आले.

# पाणी प्रश्नावर नगरसेवक आक्रमक, पण बिल्डरांच्या हमीपत्रावर मौन!

## महापालिका सर्वसाधारण सभेतील चर्चेत मुख्य मुद्याकडेच दुर्लक्ष; संजीवन सांगळे यांची व्यक्त केली नाराजी

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**शहरातील गृहनिर्माण सोसायट्यांच्या पाणीपुरवठ्याच्या अत्यंत गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकाच्या काल पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत या ज्वलंत विषयावर अपेक्षित चर्चा न होता, सभेचे लक्ष इतर वादांकडे वळल्याचे दिसून आले.**



शहरातील अनेक सोसायट्या सध्या पाणीटंचाईचा सामना करत आहेत. बांधकाम व्यावसायिकांनी प्रकल्पांना पूर्णत्वाचा दाखला (Completion Certificate) मिळवताना भामा-आसखेड पाणी प्रकल्प पूर्ण होईपर्यंत स्वखर्चाने पाणीपुरवठा करण्याचे हमीपत्र दिले होते. मात्र, प्रत्यक्षात अनेक ठिकाणी या अटींचे उल्लंघन होत असून रहिवाशांना मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत आहे.

सभेत या मुद्द्यावर ठोस चर्चा होऊन प्रशासनाने भूमिका स्पष्ट करावी, तसेच नियमभंग करणाऱ्या बिल्डर्सवर कारवाईची दिशा ठरावी, अशी अपेक्षा होती. परंतु कोणत्याही पक्षाच्या नगरसेवकाने या विषयावर एक शब्दही उच्चारला नसल्याने संताप व्यक्त होत आहे.

दरम्यान, सभेत दोन ज्येष्ठ नगरसेविकांमध्ये SRA (स्लम रिहॅबिलिटेशन अथॉरिटी) विषयावर जोरदार वादावादी झाली. या वादामुळे सभेचे लक्ष मूळ नागरी समस्यांवरून भरकटल्याची टीका होत आहे. पाणीपुरवठा हा शहरातील नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. यावर सभेत चर्चा झाली असती, तर प्रशासनाला ठोस निर्णय घेण्याची दिशा मिळाली असती आणि नागरिकांनाही दिलासा मिळाला असता.

> “ गेल्या दहा वर्षांपासून आम्ही सोसायटीधारकांच्या पाणीप्रश्नावर सातत्याने आवाज उठवत आहोत. बिल्डर्सनी भामा-आसखेड प्रकल्प पूर्ण होईपर्यंत स्वखर्चाने पाणीपुरवठा करण्याचे लेखी हमीपत्र दिले होते; मात्र त्याचा सर्रास भंग होत आहे, हा स्पष्टपणे कायद्याचा अवमान आहे. कालच्या सर्वसाधारण सभेत या गंभीर विषयावर चर्चा होऊन ठोस निर्णय अपेक्षित होता, परंतु एकाही नगरसेवकाने यावर शब्द काढला नाही, ही अत्यंत खेदजनक बाब आहे. जोपर्यंत सोसायटीधारकांना न्याय मिळत नाही, तोपर्यंत आमचा संघर्ष अधिक तीव्रतेने सुरू राहील.”
>
> — **संजीवन सांगळे, अध्यक्ष, सोसायटी फेडरेशन.**

### सोसायटीधारकांचा संताप

पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी तीव्र नाराजी व्यक्त करताना सांगितले की, “गेल्या दहा वर्षांपासून आम्ही या प्रश्नावर सातत्याने आवाज उठवत आहोत. बिल्डर्सनी दिलेल्या हमीपत्राचा भंग हा स्पष्टपणे कायद्याचा भंग आहे. सभेत या मुद्द्यावर चर्चा होऊन सोसायटीधारकांना न्याय मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र, या गंभीर विषयाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले, ही अत्यंत खेदजनक बाब आहे. हा प्रश्न सुटत नाही तोपर्यंत आमचा संघर्ष सुरूच राहील.” या पार्श्वभूमीवर, प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांना प्राधान्य द्यावे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# मोशी स्मशानभूमी येथील कचरा संकलन केंद्राचे होणार स्थलांतर!

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील मोशी स्मशानभूमी परिसरात असलेल्या कचरा संकलन केंद्राच्या स्थलांतराचा महत्त्वपूर्ण निर्णय अखेर घेण्यात आला आहे. या संदर्भातील उपसूचना महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आली असून, यामुळे स्थानिक नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.**



भाजपा नगरसेवक सचिन तापकीर यांनी या प्रश्नावर सातत्याने पाठपुरावा करत मोशी स्मशानभूमी परिसरातील कचरा संकलन केंद्रामुळे निर्माण होणाऱ्या आरोग्य व स्वच्छतेच्या समस्या प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिल्या होत्या. परिसरातील दुर्गंधी, अस्वच्छता आणि नागरिकांच्या दैनंदिन अडचणी याबाबत त्यांनी वेळोवेळी आक्रमक भूमिका घेतली होती. या मागणीची दखल घेत अखेर महापालिका प्रशासनाने कचरा संकलन केंद्र स्थलांतराबाबत सकारात्मक भूमिका घेतली असून, सर्वसाधारण सभेत संबंधित उपसूचनेला मंजुरी देण्यात आली आहे. महापौर रवि लांडगे यांनी याबाबत आश्वासित केले आहे. या निर्णयामुळे मोशी परिसरातील रहिवाशांना स्वच्छ आणि आरोग्यदायी वातावरण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

दरम्यान, या निर्णयाचे स्थानिक नागरिकांकडून स्वागत करण्यात येत असून, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न सुटल्याने समाधान व्यक्त केले जात आहे. महापालिका प्रशासनाकडून पुढील टप्प्यात नवीन ठिकाण निश्चित करून स्थलांतराची प्रक्रिया लवकरच सुरू केली जाणार असल्याची माहिती मिळत आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील हा निर्णय स्वच्छता व्यवस्थापनाच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात आहे.

> “ मोशी स्मशानभूमी परिसरातील कचरा संकलन केंद्रामुळे नागरिकांना अनेक वर्षांपासून त्रास सहन करावा लागत होता. या केंद्रापासून अवघ्या २ किमी अंतरावर कचरा डेपो आहे. मग, या ठिकाणी संकलन केंद्राची आवश्यकता नाही. प्रशासनाचा खर्च होतो आणि अत्यसंस्काराला आलेल्या नागरिकांनाही त्रास होतो. हा प्रश्न आम्ही सातत्याने महापालिकेच्या निदर्शनास आणून दिला. अखेर सर्वसाधारण सभेत उपसूचनेला मंजुरी मिळाल्याने हा परिसर लवकरच स्वच्छ व आरोग्यदायी होईल, याचा आम्हाला आनंद आहे.
>
> **- सचिन तापकीर, नगरसेवक, भाजपा, पिंपरी-चिंचवड महापालिका.**